## महत्त्वाचे

### पैठण येथे शिवप्रेमींचा जल्लोष



**पैठण (तालुका प्रतिनिधी) –** जागतिक वारसा स्थळांमध्ये छत्रपती शिवरायांच्या १२ गड किल्ल्यांचा समावेश झाल्याबद्दल पैठण येथे शिवप्रेमींनी आनंद व्यक्त करून जल्लोष साजरा केला. पैठण दुर्ग प्रतिष्ठानचे प्रतिष्ठानचे मुख्य समन्वयक शिवाजी गाडे यांच्यावतीने शनिवारी (दि.१२) पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी पैठण शहर व तालुक्यातील अनेक शिवदुर्ग प्रेमी तरुणांची उपस्थिती होती. शिवनेरी, रायगड, प्रतापगड, तोरणा, सालेर, राजगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी, पन्हाळा, लोहगड, आणि जिंजी या स्वराज्यातील बारा किल्ल्यांचा नुकताच युनेस्कोच्या वारसा स्थळांमध्ये समावेश करण्यात आला. केंद्र सरकार, राज्य सरकार, सांस्कृतिक संचालनालय, आणि राज्य दुर्ग संवर्धन समितीच्या पाठपुराव्यानंतर जागतिक स्तरावर या १२ गडकिल्ल्यांना एक वेगळी ओळख मिळाली आहे. ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करण्यासाठी शिवदुर्ग प्रेमींनी एकत्र येत मिठाई वाटप केली. यावेळी ॉ बजरंग काळे, सोपान बांगर, जालिंदर फलके, केदार मिरदे, योगेश लोहारे, संजय सोनारे, विष्णू ससाने, प्रकाश सोनवणे, शहादेव लोहारे, पत्रकार बद्रीनाथ खंडागळे, पत्रकार रमेश लिंबोरे, अनिल राऊत, पवन सिसोदे, साईनाथ कर्डिले, गणेश पवार, अजय परळकर, संतोष तांबे, अर्जुन खराद, किरण जाधव, पंकज गायकवाड, माऊली मुळे, नानाभाऊ शेंबडे, नवनाथ गोरे, अमोल तुपे, सुरज गोजरे, अशोक रोडे, धोंडीराम सकुंडे, अमोल बर्डे, रामेश्वर खंडागळे, आणि लक्ष्मण घोंगडे आदी उपस्थित होते.

### सत्यम बाफना सीए उत्तीर्ण



**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी) –** शहरातील सत्यम राजमल बाफना यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) पदवी प्राप्त केली आहे. द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने (आय.सी.ए.आय) मे २०२५ मध्ये घेतलेल्या अंतिम परीक्षेत ते उत्तीर्ण झाले आहेत. सत्यम बाफना यांचे प्राथमिक शिक्षण शेवगाव येथील विखे इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये झाले. सत्यम बाफना हे बाफना फर्निचरचे संचालक राजमल उर्फ राजु बाफना यांचे चिरंजीव तर शुभम बाफना यांचे छोटे बंधू आहेत. सत्यमला सीए अभिषेक झावरे, सीए प्रवेश गुप्ता,सीए शिरीष व्यास, सीए पुष्कर बागमार, संतोष संचेती, चिराग संचेती यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल आमदार मोनिका राजळे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड आदींनी सत्यम अभिनंदन केले आहे.

### रस्त्यांचे काम निकृष्ट; कारवाईची मागणी



**कर्जत (प्रतिनिधी) –** तालुक्यातील रवळगाव येथे रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेले पानंद रस्ते आणि पंधराव्या वित्त आयोगामधून करण्यात आलेले सिमेंटचे रस्ते निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहेत. या कामांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन कर्जतच्या गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. निवेदनावर डॉ. अक्षय खेडकर, भाग्येश खेडकर, विशाल खेडकर, सोमनाथ झांबरे, जालिंदर खेडकर, राहुल खेडकर, मल्हारी खेडकर, संकेत खेडकर यांची नावे आहेत. निवेदनात म्हटले आहे, कर्जत तालुक्यातील रवळगाव येथे रोजगार हमी योजना व पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीमधून अतिशय निकृष्ट दर्जाची रस्ते करण्यात आले आहेत. काम झाल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच रस्ते खराब झाले आहेत. गावातील एका प्रभागामध्ये तर सुरुवातीला सिमेंटचा रस्ता करण्यात आला आणि गटारीचे काम करण्यासाठी संपूर्ण रस्ता पुन्हा खोदण्यात आला. या कामांची चौकशी करून दोषीवर काराावाई कारवाई करावी.

# काम सुरू झाल्याने खा. लंके यांचे उपोषण मागे

## प्रकल्प अधिकाऱ्यांचे लेखी आश्वासन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे महाव्यवस्थापक तथा प्रकल्प संचालक वसंत पंदरकर यांच्या निर्देशानंतर ठेकेदाराने नगर-मनमाड रस्त्याचे काम सुरू केल्याने तसेच हे काम कालबध्द वेळेत पुर्ण करण्याचे लेखी आश्वासन पंदरकर यांच्या वतीने देण्यात आल्याने खा. लंके यांनी शुक्रवारपासून सुरू केलेले बेमुदत आंदोलन शनिवारी सायंकाळी मागे घेतले.

खा. लंके यांना देण्यात आलेल्या लेखी आश्वासनात नमुद करण्यात आले आहे की, या आंदोलनाची दखल घेत या रस्त्याच्या ठेकेदाराला काम सुरू करण्याबाबत निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार ठेकेदाराने शनिवारी राहुरी फॅक्टरी येथे ड्रेनेजचे काम, शनिशिंगणापुर फाटा येथे मिलिंगचे काम तसेच मौजे देहरे येथे अंडरबायपासचे काम सुरू करण्यात आलेले आहे. मौजे कणगर आणि मौजे पिंपरी निर्मळ येथे प्लॅन्ट उभारणी आणि यंत्र सामग्री व लॅबोरेटरी उभारण्यात आली असल्याचे या लेखी आश्वासनात नमुद करण्यात आले आहे. दरम्यान, खा. लंके हे आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने शुक्रवारी सायंकाळी प्रकल्प संचालक वसंत पंदरकर यांनी ठेकेदारास शनिवारी काम सुरू करण्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे शनिवारी सकाळपासून खा. लंके यांचे सहकाऱ्यांनी या रस्त्यावर प्रत्यक्ष काम सुरू झाले किंवा नाही याची पडताळणी केली. सहकाऱ्यांनी दिलेल्या अहवालानंतर खा. लंके यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यास मान्यता दर्शविली. या प्रकल्पाचे काम सातत्याने सुरू राहील व विहित वेळेत पुर्ण केले जाईल असे प्रकल्प ठेकेदाराने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कार्यालयास आश्वासीत केले आहे. हे काम वेळेत पूर्ण न झाल्यास ठेकेदारावर नियमोचित दंडात्मक कारवाई केली जाईल असेही लेखी आश्वासनात नमुद करण्यात आले आहे.

# मनपाच्या हलगर्जीमुळे रस्त्यांवर कचऱ्याचे ढिग

## संतप्त महिलांनी मांडल्या आयुक्त डांगे यांच्यासमोर व्यथा

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेचा बोजवारा उडाला असून रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी निर्माण झाली आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी पाईपलाईन रोड व पद्मानगर परिसराची पाहणी केली. या पाहणीदरम्यान नागरिकांनी थेट प्रश्नांचा भडिमार करत त्यांच्यासमोर व्यथा मांडल्या. विशेषतः महिलांनी आयुक्त साहेब, कचरा टाकू तरी कुठे? असा थेट सवाल करत प्रशासनला जाब विचारला.

मनपाकडून गेल्या काही दिवसांपासून कचरा उचलण्याची ठोस कारवाई झालेली नाही. यामुळे अस्वच्छता, मोकाट कुत्र्यांचा त्रास, डासांचे प्रमाण आणि दुर्गंधीत वाढ झाली आहे. याचा परिणाम लहान मुलं, वृद्ध यांच्या आरोग्यावर होताना दिसत आहे. याबाबत माजी नगरसेवक निखिल वारे यांनी मागील आठड्यात आवाज उठवत महापालिकेने गेल्या तीन महिन्यांपासूनचा कचरा संकलन कर घेऊ नये. महापालिकेकडून कचऱ्याच्या संदर्भात कोणतीच सुविधा मिळत नाही. महापालिकेने स्वच्छतेसंबंधी ठोस पावले उचलावीत व दररोज नागरिकांच्या घरोघरी जाऊन घंटागाडीद्वारे कचऱ्याचे संकलन करावे, अशी मागणी आयुक्त डांगे यांच्याकडे केली होती. दरम्यान, पाईपलाईन रोड व पद्मानगर परिसर पाहणी दरम्यान नागरिकांनी कचरा आणि अस्वच्छतेबाबत आयुक्त डांगे यांच्यासमोर व्यथा मांडल्या. त्यावर आयुक्त डांगे यांनी मनपाकडे सध्या कार्यरत असलेल्या कचरा संकलन एजन्सीच्या कार्यक्षमतेबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. यामुळे ही एजन्सी हटवून नव्या एजन्सीकडे कचरा संकलनाची जबाबदारी सोपवली जाईल. नवीन एजन्सीसोबत कामकाजाचा आराखडा अंतिम टप्प्यात असून लवकरच शहरात नियमित, वेळेवर आणि यंत्रबद्ध कचरा संकलन सुरू होईल, असे आश्वासन देण्यात आले.

# शालेय क्रीडा स्पर्धाच्या नियोजनसाठी नगरला बैठक

## ५६५ क्रीडा शिक्षकांची उपस्थिती

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद यांच्या वतीने आयोजित होणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ आयोजन नियोजन बैठक आणि कार्यशाळा उत्साहात पार पडली. नगरच्या न्यू आर्टस कॉमर्स अॅण्ड सायन्स महाविद्यालय येथील राजश्री शाहू सभागृहात झालेल्या या बैठकीला जिल्ह्यातील ५६५ क्रीडा शिक्षकांनी उपस्थिती दर्शवली.

यावेळी माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, संस्थेचे सहसचिव जयंत वाघ, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रा. सुनील जाधव, मनीषा पुंडे, अंजली देवकर, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, प्राचार्य विजयकुमार पोकळे, क्रीडा शिक्षक महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोतकर, जिल्हाध्यक्ष नंदकुमार शितोळे, प्रा. संजय साठे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढवळे, विशाल गर्जे, संतोष वाबळे, महेंद्र हिंगे, बापूराव होळकर, घनश्याम सानप, दिलीप काटे, सुधाकर सुंभे, संदेश भागवत, आकाश नढे यांच्यासह १४ तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी २०२४-२५ मधील शालेय क्रीडा स्पर्धाचे तालुका स्तरावर यशस्वी आयोजन केल्याबद्दल सर्व तालुक्यांचे तालुका क्रीडा प्रमुख व जिल्ह्यातील पर्यवेक्षक व मुख्याध्यापक पदावर पदोन्नती झालेल्या क्रीडा शिक्षकांचा गौरव करण्यात आला. यावेळी क्रीडा शिक्षकांचा देखील सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. दुपारच्या सत्रात शालेय क्रीडा स्पर्धामध्ये सहभागाकरिता वेबसाईटद्वारे शाळा रजिस्ट्रेशन करणे व प्राथमिक प्रवेशिका भरणे याचे प्रशिक्षण क्लिक स्पोर्ट्सचे संचालक प्रवीण बानवलीकर यांनी दिले. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी २०२५-२६ मध्ये आयोजित करावयाचे ९३ खेळ प्रकारांबद्दल माहिती दिली. तसेच तालुकास्तरावरील १० खेळ प्रकारांचे आयोजन करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत राज्यातील खाजगी अकादमीचे सक्षमीकरण करण्यासाठी आर्थिक सहाय्य योजनेची सविस्तर माहिती दिली. तसेच क्रीडा विभागाचे विविध उपक्रम, अनुदान योजनेबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सचिन गावडे यांनी केले. आभार भाऊराव वीर यांनी मानले.

# बागेतून डाळिंबाची चोरी

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी) –** डाळींबाचे वाढते बाजार पाहुन चोरट्यांनी आता आपला मोर्चा डाळिंब बागाकडे वळवला असून शहराजवळच्या ओटीवाडी येथील डाळिंब बागेतून सुमारे ८० कॅरेट डाळिंब चोरी झाले.

श्रीगोंदा पोलीस ठाण्यात विजय छगन लबडे (रा. ओटीवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या शेतातील डाळिंब तोडून सुमारे ८० कॅरेटमध्ये भरून डाळिंब चोरी करून नेले. चालू बाजार भावाप्रमाणे सुमारे पावणेदोन लाख रुपयांचा हा मुद्देमाल आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात डाळिंब चोरणारी टोळी कार्यरत असून हि टोळी दिवसा डाळिंब बागा हेरून रात्री टोळीने येऊन काही वेळात डाळिंब चोरून नेत आहे. लबडे यांच्या शेतात देखील अशाच टोळीने चोरी केली आहे. विक्रीयोग्य झालेले डाळिंब चोरून नेले. विशेष म्हणजे चोरट्यांनी छोटे आणि बदला माल तिथेच टाकून उरलेले चांगले डाळिंब चोरून नेले. शेतकऱ्यांना डाळिंबाचे बाजार वाढत असल्याने दोन पैसे मिळण्याची अपेक्षा असताना अशी चोरी होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे.

# गुंगीचे औषध देऊन अनैतिक संबंध व आर्थिक फसवणूक

## आरोपीकडून १४.७४ लाखांची लूट; धमकी देत शारीरिक छळ

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** शहरातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ४२ वर्षीय महिलेवर चहातून गुंगीचे औषध देत अत्याचार, छळ आणि लाखोंच्या फसवणुकीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी राहुल नारायण मेरगु (रा. कुंभार गल्ली, तोफखाना, अहिल्यानगर) याच्याविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १९ ऑगस्ट २०२४ पासून सुरू असून ती जाधव पेट्रोल पंपामागील एका जागी घडली. संशयित आरोपीने फिर्यादी महिलेच्या ओळखीचा गैरफायदा घेत, तिला भेटण्यासाठी बोलावले. त्यानंतर चहामध्ये गुंगीकारक औषध देत तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. इतकेच नव्हे, तर त्या प्रसंगाचे नग्न छायाचित्रे काढून त्याद्वारे ब्लॅकमेल करत, वारंवार छळ केला. त्यानंतर संशयित आरोपीने या छायाचित्रांचा वापर करून ते सोशल मिडियावर (फेसबुक व इन्स्टाग्राम) व्हायरल करण्याची धमकी दिली. या भीतीपोटी महिलेने वेगवेगळ्या वेळेस संशयित आरोपीला एकूण १४ लाख ७४ हजार ८०० रुपये दिल्याची माहिती आहे. पीडित महिलेने अखेर हा छळ सहन न होता शुक्रवारी (११ जुलै) रात्री ८:३० वाजता कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील करीत आहेत.

# दुचाकीच्या डिक्कीतून रोकड लंपास

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी) –** शहरातील मध्यवर्ती ठिकाणी भरदिवसा मोटारसायकलची डिक्की फोडून चोरट्यांनी ५० हजारांची रोकड आणि महत्त्वाची कागदपत्रे लंपास केली. ही घटना ११ जुलै रोजी दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास घडली असून सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

सुभाष सखाराम घुले (वय ५८, सेवानिवृत्त शिक्षक, रा. काटेवाडी ता. पाथर्डी, सध्या रा. एकनाथनगर, शेवगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांनी शेतीच्या कामासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पाथर्डी शाखेतून ५०,००० रुपये रोख रक्कम काढली होती. त्यानंतर ही रक्कम तसेच बँकेची चेकबुक, पासबुक आदी कागदपत्रे मोटारसायकलच्या डिक्कीत ठेवून ते काही वेळासाठी सी.एस. इंजिनिअरिंग सोल्युशन या दुकानात चौकशीसाठी गेले होते.

परंतु, काही वेळाने परत आल्यावर त्यांनी पाहिले असता डिक्की उघडी होती आणि आत ठेवलेले रोख पैसे व कागदपत्रे गायब होती. या घटनेनंतर त्यांनी परिसरात शोधाशोध केली, मात्र काहीच हाती लागले नाही. त्यामुळे त्यांनी तातडीने पाथर्डी पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदवली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसते की, स्टेट बँकेपासूनच दुचाकीवर आलेले दोन संशयित इसम घुले यांच्यावर नजर ठेवून होते आणि संधी मिळताच त्यांनी डिक्की फोडून चोरी केली. या प्रकाराने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, कारण मुख्य रस्त्यालगत आणि वर्दळीच्या भागात भरदिवसा ही चोरी झाली आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सुहास बटुळे करीत आहेत.

# बालमटाकळीची सुरक्षा आता तरुणांच्या हाती

## पोलिसांना मदत करण्याचे बैठकीत आवाहन



**शेवगाव (तालुका प्रतिनिधी) –** बोधेगाव पोलीस दुरक्षेत्रात दोन बीट येतात. यामध्ये ३१ गावांचा समावेश आहे. गावांची संख्या लक्षात घेता ६ पोलीसांची नियुक्ती आहे. हे बळ कमी आहे, मात्र गावकऱ्यांचे सहकार्य अपेक्षित असून ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करण्यासाठी तरुणांनी पुढे येणे गरजेचे आहे. पोलीस, ग्रामसुरक्षा दल, सीसीटीव्हीद्वारे चोरट्यांवर वचक निर्माण करता येईल, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी केले.

बालमटाकळी (ता. शेवगाव) येथे घडलेल्या जबरी चोरीच्या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर बालंबिका देवी मंदिरामध्ये आयोजित करण्यात आलेल्या शांतता बैठकीमध्ये मुटकुळे अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

मुटकुळे म्हणाले, गावांतून किमान ३५ तरुणांची आवश्यकता असून यामधून दररोज ५ जणांचे एक गस्ती पथक सात दिवस कार्यरत राहील. गावातील सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यासाठी ग्रामसुरक्षा दल स्थापन करणे गरजेचे आहे. स्थानिक ग्रामस्थांनी एकत्र येऊन स्वतः उभारलेली सुरक्षा यंत्रणा व पोलीस यांच्या संयुक्त प्रयत्नातून गावातील वाढत्या चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळवता येणार आहे. बालंबिका देवस्थापनचा कॅमेरा बंद होता, परंतु समोरील एका ठिकाणाहून घटनेचे फुटेज घेण्यात आले आहे. यामध्ये ग्रामपंचायतीने देखील नाविन्यपूर्ण योजनेतून गावामध्ये १५ ते २० सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे नियोजन करावे, असेही ते म्हणाले.

बैठकीस गावचे सरपंच डॉ. राम बामदळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे, माजी सरपंच तुषार वैद्य, उपसरपंच सर्जेराव घोरपडे, तंटामुक्तीचे अध्यक्ष कासम शेख, अशोक खिळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रविण महाले, पोलिस हेड कॉन्स्टेबल ईश्वर गर्जे, अंबादास गर्कळ आदी उपस्थित होते. गावकऱ्यांनी यावेळी ग्रामसुरक्षा दल उभारण्यास सहमती दर्शवली.

# पाथर्डीत मावा विक्रेत्यांवर कारवाई; १ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त


**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी) –** जिल्हा विशेष पोलीस पथकाने पाथर्डी शहरात तीन ठिकाणी मावा विक्रेत्यांवर कारवाई करत सुमारे १ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी अभिजीत लांडे व सुनिल सानप यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून अक्षय गणेश इधाटे व राहुल अर्जुन सानप फरार आहेत.

दि. ११ जुलै रोजी सायंकाळी पाथर्डी शहरातील चिंचपूर रोडवरील अक्षय पान टपरी येथे अभिजीत मिनिनाथ लांडे (२९, आनंदनगर, पाथर्डी) नावाच्या इसमाकडून मावा विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावर पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, उमेश खेडकर, मल्लिकार्जुन बनकर, दिगंबर कारखले, शंकर चौधरी, अमोल कांबळे, सुनील पवार या पथकाने छापा टाकला. छाप्यात ५ हजार ६०० रुपये किमतीचा ८ किलो तयार जप्त करण्यात आला असून, लांडे याने पुढील चौकशीत सुगंधित मावा आणि तंबाखू अक्षय इधाटे, सुनिल व राहुल सानप यांच्याकडून घेत असल्याची कबुली दिली. त्यानूसार, पथकाने इंदिरानगर परिसरातील अक्षय गणेश इधाटे याच्या पत्र्याच्या शेडवर छापा टाकून तेथून ६० हजार ८०० रुपये किंमतीची सुगंधित तंबाखू व मावा जप्त केला. यानंतर लांडे याने पथकाला तनपुरवाडी येथील दिनकर कुटे यांच्या विटभट्टीजवळील शेड येथे घेऊन गेले, जिथे सुनिल बाबासाहेब सानप (३६, शिरसाटवाडी) उपस्थित आढळला. त्याठिकाणी तपासणीदरम्यान १० किलो मावा, १२ पुडे सुगंधित तंबाखू व एक मावा तयार करण्याचे ५५ हजार रुपये किमतीचे मशीन असा एकूण ६६ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या तीन ठिकाणांवर करण्यात आलेल्या कारवायांमध्ये दोन लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन आरोपींना शनिवारी(दि.१२) पाथर्डी न्यायालयात हजर केले असता २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्या आदेशानुसार व प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव हे करत आहेत.

# गोदड महाराज यात्रेसाठी उपाययोजना करा

## नगराध्यक्ष घुले : कर्जत पंचायत समितीत शांतता कमिटीची बैठक

**कर्जत (प्रतिनिधी) –** राज्यात धाकटी पंढरी अशी ओळख कर्जतचे ग्रामदैवत थोर संत सद्गुरु गोदड महाराज यांची रथयात्रा कामिका एकादशीला २१ जूलैला होणार आहे. दोन दिवसीय या यात्रेसाठी राज्यभरातून लाखोंच्या संख्येने भाविक येतात. यावेळी येणाऱ्या सर्व भाविकांची चांगली व्यवस्था व्हावी व यात्रा शांततेने पार पडावी यासाठी प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात असे नगराध्यक्ष रोहिणी घुले सांगितले.



गोदड महाराज यांच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर कर्जत पंचायत समितीच्या सभागृहामध्ये शांतता कमिटीची बैठक झाली. यावेळी मेघनाथ पाटील, नगराध्यक्ष रोहिणी घुले, माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, उपनगराध्यक्ष संतोष मेहत्रे, सचिन घुले, तहसीलदार गुरु बिराजदार, पोलीस निरीक्षक सोपानराव शिरसाठ, गटविकास अधिकारी अजिंक्य, सूर्यवंशी, बप्पासाहेब धांडे, काकासाहेब धांडे, सुरेश ख्रिस्ती, पंढरीनाथ काकडे, ऋषिकेश धांडे, दत्तात्रय शिंदे, अनिल गदादे, प्रदीप पाटील, नारायण नेटके, प्राध्यापक सतीश पाटील, दादासाहेब सोनमाळी, शहाजी नलवडे, नगरपंचायतचे अधिकारी आजिनाथ गीते, तालुका आरोग्य अधिकारी वरकटे आदी उपस्थित होते.

संतसद्गुरुगोदडमहाराजांचा रथोत्सव नियमानुसार उत्साहात साजरा करावा असे आवाहन तहसीलदार गुरू बिराजदार यांनी केले. दरम्यान, यात्रेच्या दिवशी मंदिरामधून भव्य रथामध्ये मूर्ती ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये गर्दी व धक्काबुक्की होते.ती टाळण्यासाठी नियोजन करावे अशी मागणी मंदिर प्रशासनाच्यावतीने करण्यात आली. यात्रा कालावधीत पोलीस बंदोबस्तामध्ये वाढ करावी, रथमार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे. वाहतूक व्यवस्था, पार्किंगबाबत बैठकीत सूचना देण्यात आल्या.

### बंदोबस्तात वाढ करा; व्यापाऱ्यांची मागणी

कर्जत येथील संत सद्गुरु गोदड महाराजांच्या दोन दिवसीय या यात्रोत्सवासाठी बंदोबस्तात वाढ करावी, अशी मागणी कर्जत शहर व्यापारी असोसिएशनने पोलीस निरीक्षक सोपानराव शिरसाठ यांच्याकडे शनिवारी (दि.१२) निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी अध्यक्ष विभीषण खोसे, उपाध्यक्ष महावीर बोरा, एडवोकेट योगेश भापकर, सचिव प्रसाद शहा, खजिनदार संतोष भंडारी, गणेश तोरडमल, सुरेश नहार आदी उपस्थित होते.निवेदनात म्हटले आहे, यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये भाविक दर्शनासाठी येतात. मोठ्या प्रमाणामध्ये गर्दी होऊन यात्रेकरू आणि व्यापारी यांना अनेक अडचणी निर्माण होतात. त्यांच्या संरक्षणासाठी पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात यावी. व्यापारी दुकानांच्यासमोर वाहने लावण्यासाठी प्रतिबंध करावा, मेन रोडवर वाहतूक नियंत्रण करण्यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, रथ मार्ग, मंदिर परिसर, आनंदनगरी, मेन रोड व बसस्थानक या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा. या काळामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये दागिने चोरणाऱ्या आणि खिसे कापणाऱ्या टोळ्या शहरांमध्ये येतात आणि भाविकांची लूट करतात. त्यामुळे यावर नियंत्रण आणण्यासाठी विशेष पथक नेमण्यात यावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.